वि.दि.दा. क्र.९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.२
(नि.क्र.४३६)

**माझे नाव -** तानाजीराव बापूसाहेब पाटील**, वय** – ७५ वर्षे**,**
**धंदा -** व्यावसायिक **, रा.** जयसिंगपूर ता. शिरोळ**.**

**<u>वादीतर्फे सरतपास श्री.व्ही.एस.शेळके वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**१.** मी वादी क्रं. १ ला ओळखतो. ते गारगोटी, कोल्हापूर येथे नौकरीस असताना त्यांची माझी ओळख झाली होती. ते वनखात्यात नौकरीला होते. गारगोटीमध्ये माझा पी.व्ही.सी पाईप व मोटरचा व्यवसाय होता. माझ्याकडे गरवारे पाईपस व टेक्समो मोटर्स यांची एजन्सी होती. ते माझ्या दुकानी येऊन बसत आणि गावाकडे पाईपलाईन करायची आहे त्यावेळी तुमची मदत लागत असे मला म्हणत असे. कोपरा ता. अहमदपूर येथील वादी गंगाधर यांच्या जमीनीत पाईपलाईन करण्यापूर्वी तिचा सर्वे करायचा असल्याने मी त्यांच्या गावी आलो होतो. साधारण ७० एकर क्षेत्राचा सर्वे मी केला. त्यांच्या शेताजवळ असलेल्या नदीपात्रात त्यांनी एक विहीर पाडली आहे. त्या विहीरीपासून मी सर्वे सुरु केला. मी त्यांना माझ्या यशश्री टेक्नोसेल कॉपोरेशन या दुकानातून सिंचनाच्या पाईप व मोटर पुरविल्या. पाच इंची, ३००० फुट पाईप व १० एच.पी च्या दोन मोटर मी त्यांना पुरविल्या. या पाईपलाईनसाठी व इतर पाईपलाईनसाठी लागणारे सर्व साहित्य माझ्या दुकानातून घेतले. पाईपलाईन अंथरुन मी त्याची चाचणी सुध्दा घेतली होती. सदर जमीन ओलीताखाली आणणे त्यात डाळींब बाग लावणे हा त्यांचा उद्देश होता. ४० ते ५० एकर क्षेत्र या पाईपलाईनने ओलीताखाली आले. या व्यवहाराला साधारण ३५ ते ३७ वर्षे झाली तसेच माझी फर्महीं बंद झाली त्यामुळे त्याच्या पावत्यांचे अभिलेख माझ्याकडे नाहीत. मी साक्षीसमन्सने न्यायालयात आलो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>प्रतिवादी १ ते ५ तर्फे श्री. बी.एन.पौळ वकिल यांच्यामार्फत उर्वरीत सरतपास शपथेवर सुरु.</u>**

**२.** वादी क्रं. १ ला तीन भाऊ होते. त्यांची व माझी ओळख नाही.

वि.दि.दा. क्र.९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.२
(नि.क्र.४३६)



मला सरतपासात नमूद केलेल्या ७० एकर जमीनीचे गट क्रमांक व चतु:सिमा माहिती नाहीत. हे खरे की, या जमीनी कोणाच्या नावे आहेत हे मला माहिती नाही. सन १९८९ साली मी पहिल्यांदा ज्यावेळी गंगाधर यांच्याकडे आलो त्यावेळी ते व त्यांचे भाऊ एकत्र राहत होते. त्यांच्यामध्ये वाटण्या कधी झाल्या हे मला माहिती नाही. मला माझ्या दुकानाचा परवाना क्रमाक सांगता येणार नाही. त्याचा वॅट क्रमांक सांगता येणार नाही. माझ्या दुकानाचे लेटरपॅड, बिले, परवाना असे सर्व स्टेशनरी साहित्य होते. मी सर्वे कधी केला त्याची साल, तारीख मला सांगता येत नाही. त्याचे रेकॉर्ड नाही हे खरे आहे. हे खरे की, पाईपलाईन मोटर याची जोडणी मी स्वत: करीत नाही. मी पाहिलेल्या विहीरीत भरपूर पाणी होते. ती बांधलेली होती. विहीरीचा गट क्रंमाक किंवा ती कोणाच्या मालकीची होती हे मला सांगता येणार नाही. पाईपलाईन केल्यानंतर २ वर्षांनी माझी व गंगाधर यांची भेट झाली. पाईपलाईन अंथरणा-या व मोटर जोडणा-या कर्मचा-यांची नावे मला सांगता येणार नाही. या पाईपलाईन व मोटरचे बील दीड ते पावणेदोन लाख रुपये झाले होते. मी आयकर भरायचो. त्यात हा हिशोब दिला आहे. ते आता मी दाखल करु शकत नाही. हे खरे नाही की, मी कधीही कोपरा गावी आलो नाही, वादीला मोटर व पाईप विकले नाहीत. हे खरे नाही की, मी व गंगाधर मित्र असल्याने मी खोटी साक्ष देतो.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**